

# श्री. विठ्ठलराव देसाई एक करारी व्यक्तिमत्त्व !

प्रा. डॉ. वृंदा देशपांडे-जोशी

परतूर! आपुलकीची जिव्हाळ्याची मनावर कोरली गेलेली ही चार अक्षरं, आजही उच्चारताना अंगावर रोमांच उभं करतात. पराक्रमाच्या साऱ्या स्मृती मन:पटलावर तरंगून जातात. अभिमानानं अन् आनंदानं उर भरून येतो. आपोआपच श्री. विठ्ठलराव देसाई यांच्या स्मृतीसमोर माथा झुकतो!

परतूर म्हणजे पूर्वीच्या औरंगाबाद आणि परभणी जिल्ह्याच्या मध्यावर वसलेले तालुक्याचे ठिकाण. हा तालुका सर किशनप्रसाद बहादूर यांच्या जहागिरीचा होतो. तालुक्यात एकूण ९६ गावे होती. जिल्हा न्यायालय, डेप्युटी कलेक्टर कार्यालय. दोन पोलीस स्टेशन, एक मिडल स्कूल त्याचबरोबर व्यापाराच्या सुविधा तालुक्यामध्ये उपलब्ध करून दिलेल्या होत्या. दहा हजार लोकसंख्या असलेल्या या गावात सामुदायिकरीत्या सामाजिक कामे केली जात. याच सामाजिक एकजुटीने राजकीय परवशतेचे भान जागवले. इंग्रज, निझाम आणि जहागीरदार अशा तिहेरी गुलामगिरीखाली संस्थानी जनता भरडली जात होती. सुरुवातीच्या काळात या अन्यायविरुद्ध ब्रही काढण्याची हिम्मत नसलेल्या सामान्य माणसाला हळूहळू प्रतिकाराचे बळ मिळत गेले. या बदलामागे कोणतीही जादूची कांडी नव्हती तर जीव धोक्यात घालून, स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी क्षणोक्षणी पत्करलेली जोखीम होती! मन मारून वर्षानुवर्षे जगत राहण्यापेक्षा मान उंचावून हौतात्म्य पत्करण्याची दाखवलेली तयारी होती. अशाच कार्यकर्त्यांपैकी एक म्हणजे श्री. विठ्ठलराव देसाई. अवघं परतूर त्यांना दादा देसाई या नावानं ओळखत होतं!

विठ्ठलरावांचं बालपण वडील वामनराव, आई रंगूबाई यांच्या संस्कारानं समृद्ध झालेलं होत. आपलं जीवन सचोटीनं जगावं. सभोवतालचं भान बाळगावं.